महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र.मासं/रवंका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉटनं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## **प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२७ दिनांक ०९/०८/२०२१**

**विषय :** विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरणे बाबत.

**संदर्भ:** १. परिपत्रक क्र.मासंवि/मावक/७७३ दि.१०.०१.२०१८
२. शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दि. ०७.०५.२०२१

आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीय कर्मचा-यांना सेवेतील आरक्षणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेले आदेश तत्कालीन म.रा.वि.मंडळाने व त्रिभाजन झाल्यानंतर म.रा.वि.विकं.मर्या.मध्ये अंगीकृत करण्यात आलेले आहे.

२. यापूर्वी, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दि.२५.०५.२००४ नुसार शासन सेवेत असलेल्या मागासवर्गीय कर्मचारी यांना पदोन्नतीमधील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू केलेले आहे. या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ वर दि. ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण रद्द केल्यानंतर उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून शासनाने पदोन्नतीच्या कोटयातील पदे भरण्या संदर्भात शासन पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६ब दि. २९.१२.२०१७ अन्वये पदोन्नतीच्या कोटयातील ३३ टक्के आरक्षित पदे रिक्त ठेऊन केवळ खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरण्याबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या होत्या. सदरच्या सूचना परिपत्रक क्र.मासंवि/मावक/७७३ दि.१०.०१.२०१८ अन्वये कंपनी अंतर्गत अंगिकृत केलेल्या आहेत.

३. आता, महाराष्ट्र शासनाने मागासवर्गीयांची पदे मोठया प्रमाणावर रिक्त असल्याने आणि पदोन्नतीच्या कोटयातील पदे भरण्याबाबत मागासवर्गीय संघटना आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून होणारी मागणी विचारात घेऊन शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दि. ०७.०५.२०२१ अन्वये सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दि. २०.०४.२०२१ अधिक्रमीत करुन खालील प्रमाणे सुधारीत निर्णय निर्गमित केलेल्या आहेत व सदर सुचना सक्षम अधिकारी यांनी तथा मंडळ ठराव क्र. २३५९ दि. ०५.०८.२०२१ अन्वये कंपनीत अंगीकृत करण्याकरीता मंजुरी प्रदान केलेली आहे.

क) जे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी संदर्भाधिन क्र.१ येथिल दि.२५.०४.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थावर आले आहेत असे अधिकारी/कर्मचारी -

अ) दि.२५.०५.२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५.०५.२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व;

ब)     दि.२५.०५.२००४ नंतर शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

ख)     उक्त पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरिल अंतिम निर्णयाच्या अधीन असतील. सदरची कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय/अधिकारी/कर्मचा-यांना पदावनत करण्यात येऊ नये.

४.     सबब, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ ची प्रत सोबत जोडली असून, शासनाने प्रसारीत केलेल्या सूचनांचे अवलोकन करण्यात यावे व पारित केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात यावी.

५.     सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत** : दि. ०७.०५.२०२१ रोजीचे शासन निर्णय

**(अ.प्र.भादीकर)**
**कार्यकारी संचालक(मासं)**

**प्रत सविनय सादर :**
१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना :**
१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत रवाना :**
१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
७) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**<u>विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ०७ मे,२०२१.

<u>वाचा</u>:- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,दि.२५ मे,२००४

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग ,क्रमांक: बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. २० एप्रिल, २०२१

**शासन निर्णय-**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.२० एप्रिल, २०२१ याद्वारे अधिक्रमित करुन सुधारीत शासन निर्णय खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.०५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत.

३. जे मागासवर्गीय अधिकारी /कर्मचारी संदर्भाधिन क्र.१ येथील दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी /कर्मचारी-

(अ) दि.२५.०५.२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५.०५.२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व ;

(ब) दि.२५.०५.२००४ नंतर शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

४. उक्त पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील. अशी कार्यवाही करतांना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना पदावनत करण्यात येऊ नये.

५. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२१०५०७१३११२७५६०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=41d02a5c663d2c05d362d4847bea4a1874fda4e9cb60284fb102fd7b9b3891b3, cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2021.05.07 13:20:06 +05'30'

**(र. अं.खडसे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१.माननीय राज्यपाल यांचे सचिव,
२.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४.माननीय विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५.माननीय विरोधी पक्षनेता,विधानसभा
६.सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१३.सर्व जिल्हाधिकारी,
१४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१८.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१९.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१.सचिव,राज्य माहिती आयोग,
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२८.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९.संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०. निवड नस्ती १६-ब